## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०२.०३.२०१७<br>०१.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०१.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे पिशोर:—** गुरन I ६६/१७ कलम ३०७ ३२३ ५०६ ३४ भादवि नमुद गुन्हयातील महिला फिर्यादी रा. जैतखेडा ता. कन्नड यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) मिठ्ठु पवार पुर्ण नाव माहीत नाही व ईतर ०२ सर्व रा. जैतखेडा ता. कन्नड यांनी दिनांक २६.०२. २०१७ रोजी १९.३०वा. यातील फिर्यादी बाई हि आरोपीचे घरी मुलगी सोनी हिचे बाबत विचारपुस करण्यासाठी गेली असता वरील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस लोटलाट करून लाथाबुक्याने मारहाण केली व आ.क्रं. ०१ याने पळत जावुन घरातुन विषारी औषधाची बाटली घेवुन जिव जाईल या उद्देशाने फिर्यादीचे तोंडात ओतले व ईतर आ.क्रं. ०२ व ०३ यांनी पाय धरून घेतले व हिला जिवंत सोडायचे नाही असे म्हणुन जिवे मारण्याचा प्रयत्न करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. मोरे सपोनि पोस्टे पिशोर हे करीत आहे.

**०२) पोस्टे चिकलठाणा:—** गुरन I ९१/१७ कलम ३७९ भादवि सहकलम २१(१)(२)(३)(४)(५) गौण खनिज कायदा यातील फिर्यादी नामे गणेश प्रकाश सोनवणे वय ३० वर्ष व्यवसाय नौकरी तलाठी सज्जा वरूडकाझी ता.जि. औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील ट्रक क्रं. एमएच २१ एक्स ८००६ चा चालक नावगाव माहीत नाही याने त्याची ट्रक क्रं. एमएच २१ एक्स ८००६ मध्ये पळशी येथुन वाळु वाहतुक करीत असताना तहसिल कार्यालयाचे पथकाने सदर आरोपीस

वाळु ची विनापरवाना बेकायदेशीर रित्या रॉयल्टी न भरता वाहतुक चोरटी विक्री करण्याचे उद्‌देशाने अनाधिकृत वाळु सह मिळुन आला त्याचे ताब्यातुन ०२ ब्रास वाळु किं. ७३५०/—रू. व ट्रक क्रं. एमएच २१ एक्स ८००६ कि. ८ लाख रूपये असा एकुण ८ लाख ७३५०/—रू. किं. चा मुद्येमाल म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/३८४ काळे पोस्टे चिकलठाणा हे करीत. आहे.

**०३) पोस्टे करमाडः—** गुरन I ७८/१७ कलम ३०४(अ) २७९ ४२७ ३३८ भादवि मधिल फिर्यादी नामे लखन भगवान पवार वय २५ वर्ष व्यवसाय मासेमारी रा. पिंप्रीराजा ता.जि. औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील मयतः— भगवान शामराव पवार वय ४५ वर्ष रा. पिंप्रीराजा ता.जि. औरंगाबाद याने त्याचे ताब्यातील मो.सा.क्रं. एमएच २० डीझेड ०४९५ हि भरधाव वेगात व निष्काळजीपणे रोडची परिस्थीती न पाहता चालवुन वळण रस्त्यावर वाहन स्लीप होवुन स्वतःचे मरणास व पाठीमागे बसलेल्या ईसमास किरकोळ जखमी करण्यास व मो.सा.चे नुकसानीस कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. जाधव पोउपनि पोस्टे करमाड हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे पैठणः—** आ.मृ. नंबर ०९/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पोह/२९९ आर.आर. गायके नेमणुक घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे मंगल रूपेश गजरे वय २८ वर्ष रा. चनकवाडी ता. पैठण हि दिनांक दिनांक १५.०२.२०१७ रोजी ०४. ४०वा. मंगल रूपेश गजरे वय २८ वर्ष रा. चनकवाडी हि जळाल्याने तीचा सफौ धादवड यांनी जबाब घेता वय ३२ वर्ष असे सांगीतले तीचे वर घाटी दवाखाना येथे औषधोपचार चालु असताना ती दिनांक ०१.०३.२०१७ रोजी २१.१५ वा. मरण पावली वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/७८६ शेख पोस्टेपैठण हे करीत आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री सफौ चव्हाण नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण